POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०५ ● अंक-७८ ● मुंबई, सोमवार, २० ऑक्टोबर २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## खोटा रिपोर्ट चुकीचे उपचार अन् थेट अवयव तस्करी

### महाराष्ट्रात धक्कादायक प्रकार उघड कुटुंबियांना रुग्णालयातून बॉडी मिळालीच नाही...

**■अहिल्यानगर। प्रतिनिधी,**

साध्या घशाच्या त्रासासाठी रुग्णालयात दाखल झालेल्या ७९ वर्षीय वृद्धावर करोना झाल्याचे खोटे रिपोर्ट तयार करून केवळ पैसे उकळले. इतकंच नाही तर चुकीच्या उपचारांमुळे वृद्धाचा मृत्यू झाला. शिवाय अवयव तस्करीसाठी मृतदेहाची परस्पर विल्हेवाट लावल्याचा थरकाप उडवणारा प्रकार समोर आला आहे.

**उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर गुन्हा दाखल**

उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठाच्या आदेशानंतर तोफखाना पोलीस ठाण्यात सहा नामांकित डॉक्टर आणि अनोळखी कर्मचाऱ्यांविरोधात गंभीर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेने अहिल्यानगरच्या वैद्यकीय क्षेत्रात तीव्र संताप आणि खळबळ उडाली आहे. फियार्दी अशोक बबनराव खोकराळे यांच्या तक्रारीनुसार, त्यांचे वडील बबनराव खोकराळे यांना १३ ऑगस्ट २०२० रोजी किरकोळ घशात खवखव आणि बद्धकोष्ठतेचा त्रास होत असल्याने उपचारासाठी नेण्यात आलं.

मात्र रुग्णालयातील डॉक्टरांनी खोटा आरटीपीसीआर



रिपोर्ट तयार करून जबरदस्तीने कोविड सेंटरमध्ये दाखल केलं. त्यानंतर कुटुंबियांना रुग्णाशी भेटण्यास स्पष्ट मनाई करण्यात आली. १८ ऑगस्ट रोजी रुग्णालयाने १ लाख ८४ हजार रुपयांचं बिल भरल्यानंतरच रुग्णाच्या मृत्यूची माहिती दिली. त्यानंतर मृतदेह मिळवण्यासाठी जिल्हा रुग्णालय आणि महानगरपालिकेकडे संपर्क साधावा, असं सांगण्यात आलं. मात्र, आजतागायत मृतदेहाचा काहीच मागमूस लागलेला नाही.

**फसवणूक, कटकारस्थान आणि मृत्यूस कारणीभूत**

या प्रकरणात अहिल्यानगरमधील नामांकित रुग्णालयाचे डॉ. गोपाळ बहुरुपी, डॉ. सुधीर बोरकर, डॉ. सचिन पांडुळे, डॉ. अक्षयदीप झावरे, डॉ. मुकुंद तांदळे तसंच विखे पाटील मेमोरिअल रुग्णालय लॅबचे तज्ञ डॉक्टर यांच्यावर फसवणूक, कट कारस्थान आणि मृत्यूला कारणीभूत ठरल्याचे गंभीर आरोप करण्यात आले आहेत.

**फिर्यादी अशोक खोकराळे म्हणाले...**

रुग्णाला बेडला बांधून ठेवलं, धमकावलं, अन्न न देता छळ केला. शिवाय, एकाच दिवशी दोन वेगवेगळ्या हॉस्पिटलमध्ये दाखवून बिलं फुगवण्यात आली. पुरावे नष्ट करण्यासाठी आणि अवयव तस्करीच्या हेतूने मृतदेहाची परस्पर विल्हेवाट लावल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. माझ्या वडिलांचा मृतदेह आजतागायत सापडलेला नाही. खोटा करोना रिपोर्ट तयार करून रुग्णालयाने पैशांची उकळी केली. सर्व काही काळोखात लपवण्यात आलं. हे आरोग्यसेवेचं नाही, तर थेट गुन्हेगारीचं रॅकेट आहे, असे आरोप त्यांनी केले आहेत.




## मुंबई पोलिसांची फटाक्यांवर कडक नियमावली...

**सुरक्षेत वाढ**

वरिष्ठ वाहतूक पोलिस अधिकारी अनिल कुंभारे यांनीही नागरिकांना सावध राहण्याचे आवाहन केले. "प्रमुख रस्ते, उड्डाणपूल आणि जंक्शनवर फटाके फोडून वाहतुकीला अडथळा निर्माण करणाऱ्यांवर तात्काळ कारवाई केली जाईल," असे ते म्हणाले. दिवाळीच्या काळात शहरातील प्रमुख चौक, सिग्नल आणि बाजारपेठांमध्ये अतिरिक्त पोलिस आणि होमगार्ड तैनात करण्यात आले आहेत. वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी पेट्रोलिंग आणि सीसीटीव्ही देखरेख वाढवण्यात आली आहे. मुंबई पोलिसांनी नागरिकांना प्रदूषणमुक्त, सुरक्षित आणि आनंदी दिवाळी साजरी करण्याचे आवाहन केले आहे. फटाक्यांऐवजी दिवे, सजावट आणि पर्यावरणपूरक उपाय वापरून सण साजरा करण्याचा संदेशही देण्यात आला आहे.

**■मुंबई। प्रतिनिधी,**

दिवाळी सणाच्या काळात शहरात शांतता, सुरक्षितता आणि प्रदूषणमुक्त वातावरण राखण्यासाठी मुंबई पोलिस आणि वाहतूक पोलिसांनी कठोर नियम लागू केले आहेत. गर्दीचीं आणि संवेदनशील ठिकाणे जसे की धार्मिक स्थळे, रुग्णालये, पेट्रोल पंप, रेल्वे स्थानके, बस डेपो आणि दाट लोकवस्ती असलेले भाग या सर्व ठिकाणी फटाके फोडण्यावर संपूर्ण बंदी घालण्यात आली आहे.

दिवाळीच्या दिवशी रात्री १० वाजेपर्यंत नागरिकांना फटाके फोडण्याची परवानगी असेल. या वेळेच्या बाहेर फटाके फोडल्यास संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशारा पोलिसांनी दिला आहे.

ध्वनी प्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रत्येक भागासाठी आवाजाची मयार्दा निश्चित करण्यात आली आहे. औद्योगिक भागात दिवसा ७५ डेसिबल



आणि रात्री ७० डेसिबलपेक्षा जास्त आवाज होऊ नये. व्यावसायिक भागात दिवसा ६५ आणि रात्री ५५ डेसिबल, तर निवासी भागात दिवसा ५५ आणि रात्री ४५ डेसिबल अशी मयार्दा आहे. याशिवाय, शांतता क्षेत्रांमध्ये जसे की शाळा, मंदिरे आणि रुग्णालये दिवसा ५० आणि रात्री ४० डेसिबलपेक्षा जास्त आवाज करण्यास सक्त मनाई आहे. नागरिकांनी या मयार्दांचे पालन करावे, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

मुंबई पोलिसांचे सहआयुक्त सत्यनारायण चौधरी यांनी सांगितले की, "पोलिस विभाग सणाच्या काळात कायदा आणि सुव्यवस्था कायम ठेवण्यासाठी पूर्ण सज्ज आहे. नागरिकांनी शांततेत, सुरक्षिततेत आणि जबाबदारीने सण साजरा करावा. कुठलीही संशयास्पद हालचाल किंवा कायद्याचे उल्लंघन दिसल्यास त्वरित पोलिस नियंत्रण कक्षाला माहिती द्यावी." त्यांनी पुढे सांगितले की, "ध्वनी आणि वायू प्रदूषणामुळे लहान मुले, गर्भवती महिला, वृद्ध आणि आजारी लोकांना गंभीर त्रास होतो. म्हणूनच फटाक्यांवर मयार्दा ठेवण्यात आल्या आहेत."

## 'ऑक्टोबर हिट'ने मुंबईकर घामाघूम!

### तापमान ३२; पण भास ४१चा... सोशल मीडियावर भावनांचा भडका

**■मुंबई। प्रतिनिधी,**

ऑक्टोबरमधील प्रखर उष्णतेने मुंबईकर हैराण झाले आहेत. गुगल वेदरनुसार, शहरातील तापमान ३४ डिग्री सेल्सिअसपर्यंत पोहोचले असले तरी उष्णता ४१ डिग्री सेल्सिअसप्रमाणे जाणवत आहे. अत्यंत दमट हवामान आणि तीव्र उन्हामुळे दैनंदिन कामकाजादरम्यान अनेकांना घामाच्या धारा वाहत आहेत. लोकल-बेस्ट प्रवास, कामाचे ठिकाण आणि प्रत्यक्षातील महानगरातील फिरणे असे सगळेच त्रासदायक बनले आहेत. हवामान खात्याने तीव्र उन्हाची लाट लवकरच ओसरू शकते, असा अंदाज व्यक्त केला आहे. असामान्य गरमी आणि आर्द्रतेमुळे माणसेच नव्हे तर झाडेही त्रस्त झाली असून अनेकांनी थकवा, निर्जलीकरण आणि गरगरणे याची तक्रार केली आहे. प्रचंड उष्णतेमुळे सोशल मीडियावर मुंबईकरांचा रोष उसळला आहे. अनेकांनी आपल्या अनुभवांची व्यथा व्यक्त केली आहे.

### पुण्यातील शनिवारवाड्यात नमाज पठण?

## काय आहे व्हायरल व्हिडीओ मागील सत्य

**■पुणे। प्रतिनिधी,**

शनिवारवाड्यासमोरील उद्यानात मुस्लीम लोकांमार्फत नमाज पढण्याचा एक कथित व्हिडीओ व्हायरल झाल्याने खळबळ उडाली आहे. या व्हिडीओमुळे शांत असलेल्या पुण्यात खळबळ उडाली आहे. हा प्रकार समाजमाध्यमांत व्हायरल करण्यात आला आहे. इंस्टाग्रामवर या संदर्भात एक कथित व्हिडीओ व्हायरल होत असल्याने आता निरनिराळ्या चर्चा होत आहेत. हा प्रकार नेमका कसा आणि कधी घडला याविषयी तर्क वितर्क केले जात असून या संदर्भात आता हिंदू संघटनांनी विरोध केल्याचे पुढे येत आहे.

पुण्याच्या प्रसिद्ध ऐतिहासिक शनिवार वाड्याच्या आतील बाजूला मुस्लीमांना धार्मिक कार्य करत नमाज पठण केल्याचा व्हिडीओ व्हायलर झाला आहे. या घटनेनंतर आता पतितपावन संघटनेच्या वतीने शनिवार वाड्यात शिव वंदना केली जाणार असल्याने शनिवार वाड्याच्या प्रवेशद्वारावर मोठा पोलिस बंदोबस्त तैनात केला गेला आहे. या पूर्वी सारस्वत बाग येथेही अशाच प्रकारे मुस्लीमांनी नमाज पढण्याच्या कार्यक्रम केला होता असा आरोप केला जात आहे.



**मेधा कुलकर्णी यांनी घेतली भूमिका**

शनिवार वाडा हा आमच्या विजयाचे प्रतीक आहे त्यामुळे या ठिकाणी ज्यांनी येऊन नमाज पठण केला आहे, त्या जागेचा शुद्धीकरण आम्ही शिववंदना करून करणार आहोत. असं काम करत असाल तर इथून पुढे खपवून घेतलं जाणार नाही. येथे आम्ही आता शिव वंदना करण्यासाठी आम्ही इथे एकत्र आलो आहोत. येथे हिंदू धर्मच चालेल असे खासदार मेधा कुलकर्णी यांनी म्हटले असून त्या शनिवारवाडा येथे दाखल झाल्या आहेत.

**गोमूत्र शिंपडून शुद्धीकरण**

ऐतिहासिक शनिवार वाड्याच्या आत मुस्लीमांकडून नमाज पढण्याचा प्रकार उघडकीस आल्यानंतर पतित पावर संघटना आणि इतर हिंदू संघटनांनी येथे रविवारी सायंकाळी जमून शिव वंदना घेतली. या वेळी भाजपाचा खासदार मेधा कुलकर्णी देखील हजर होत्या. यावेळी येथे गोमूत्र शिंपडून ही जागा पवित्र करण्यात आला. या वेळी खासदार मेधा कुलकर्णी यांनी उपस्थित हिंदू कार्यकर्त्यांचे या शुद्धीकरणाबद्दल अभिनंदन देखील केले.

## महाराष्ट्रात पुन्हा निवडणुकांचा धुरळा, मुहुर्त ठरला, कोणत्या महिन्यात होणार घोषणा?

**निवडणुका नोव्हेंबरअखेर घेण्याची योजना**

राज्य निवडणूक आयोगाने महापालिका, नगरपालिका, नगरपंचायत, जिल्हा परिषद आणि पंचायत समिती अशा त्रिस्तरीय निवडणुका घेण्यासाठी योजना आखली आहे. या संदर्भात आयोगाने राज्य सरकार आणि जिल्हा प्रशासनासोबत तयारीचा आढावा घेतला आहे. या निवडणुकांचा प्रस्तावित टप्पा समोर आला आहे. यानुसार २४७ नगरपालिका आणि १४७ नगरपंचायतींच्या निवडणुका नोव्हेंबरअखेर घेण्याची योजना होती. परंतु आता त्या डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात होण्याची शक्यता आयोगाने वर्तवली आहे. तर दुसरा टप्पा डिसेंबर अखेरीस राज्यातील ३२ जिल्हा परिषदा आणि ३३६ पंचायत समित्यांच्या निवडणुका होतील. तसेच जानेवारी १५ ते २० दरम्यान २९ महानगरपालिकांच्या निवडणुका पार पडतील, अशी माहिती सूत्रांनी दिली आहे.

**■मुंबई। प्रतिनिधी,**

राज्यात महापालिका आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका दीर्घकाळापासून लांबल्या आहेत. गेल्या पाच वर्षांपासून महाराष्ट्रात रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लवकरच घेण्यात येणार आहे. राज्यातील नगरपालिका, नगरपंचायत निवडणुका डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर, राज्यातील प्रलंबित असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाने तयारी सुरु केली आहे. त्यानुसार नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात निवडणुकीची घोषणा होण्याची शक्यता आहे. यामध्ये पहिल्या टप्प्यात राज्यातील २४७ नगरपालिका आणि १४७ नगरपंचायतींच्या निवडणुका डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात होण्याची शक्यता आहे.

**सर्वच पक्षांची तयारी सुरु**



सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार जानेवारी अखेरपर्यंत सर्व निवडणुकांची प्रक्रिया पूर्ण करणे आवश्यक आहे, त्यानुसार २० जानेवारीपूर्वी प्रक्रिया पूर्ण करण्याचा राज्य निवडणूक आयोगाचा प्रयत्न आहे. याच पार्श्वभूमीवर सर्वच पक्ष तयारीला लागले आहेत. येत्या नोव्हेंबर महिन्यात जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांच्या निवडणुका सर्वात आधी होण्याची शक्यता होती. मात्र, नुकत्याच झालेल्या अतिवृष्टीमुळे ग्रामीण भागातील शेतीत मोठे नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांसाठी मदत जाहीर झाली असली तरी ती प्रत्यक्ष हाती मिळण्यास विलंब लागत आहे. त्यामुळे जिल्हा परिषदेच्या निवडणुका डिसेंबर अखेरीस घ्याव्यात, अशी मागणी महायुतीकडून केली जात आहे.

**मनसे महाविकासआघाडीची मागणी काय?**

तर दुसरीकडे महाविकास आघाडी आणि मनसे यांनी सदोष मतदार याद्यांवरून राज्य निवडणूक आयोगावर टीका केली आहे. घोळ मिटल्याशिवाय निवडणुका न घेण्याची मागणी केली आहे. या तक्रारींची दखल घेऊन निवडणूक आयोगाने संबंधित जिल्हाधिकाऱ्यांकडून अहवाल मागवला आहे. ही प्रचलित पद्धत असून तक्रारी आल्यास जिल्हाधिकारी किंवा निवडणूक अधिकाऱ्यांकडून अहवाल मागवला जातो, असे आयोगाच्या वरिष्ठांनी स्पष्ट केले आहे. राज्य निवडणूक आयोग निवडणुकांच्या दृष्टीने तयारी करत असून या महिनाअखेर किंवा नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात नगरपालिका निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर होण्याची शक्यता आहे.

## नाशिक रेल्वे स्थानकात भयानक गर्दी... ट्रेनच्या धडकेत २ प्रवासांचा मृत्यू

**■नाशिक। प्रतिनिधी,**

दिवाळीच्या आदल्या दिवशी महाराष्ट्रात मोठी रेल्वे दुर्घटना घडली आहे. नाशिक रेल्वे स्थानकावर एक दुर्दैवी अपघात घडला. मुंबईहून बिहारला जाणारी कर्मभूमी एक्सप्रेस पकडण्याचा प्रयत्न करताना तीन प्रवाशांना ट्रेनची धडक बसली. यात दोघांचा जागीच मृत्यू झाला, तर एक गंभीर जखमी झाला.

महाराष्ट्रातील नाशिकमध्ये दिवाळीसाठी घरी परतणारे तीन प्रवासी चालत्या ट्रेनमधून पडले. या अपघातात एका प्रवाशाचा मृत्यू झाला आणि दुसऱ्या प्रवाशाला गंभीर दुखापत झाली. नाशिक रोड रेल्वे स्थानकाजवळ बिहारकडे जाणाऱ्या ट्रेनमधून अचानक तीन जण पडल्याने



हा अपघात झाला. पोलिसांच्या माहितीनुसार, ही घटना रात्री ९ वाजण्याच्या सुमारास घडली. प्रवासी लोकमान्य टिळक टर्मिनस - रक्सौल (बिहार) एक्सप्रेस (१२५४६) ने प्रवास करत होते. ही ट्रेन नाशिक रोड रेल्वे स्थानकावर थांबत नाही आणि थेट मुंबईहून भुसावळला जाते. कर्मभूमी एक्सप्रेस नाशिक स्थानकावर थांबत नाही, परंतु तिथे ट्रेनचा वेग कमी होत होता. तीन प्रवाशांनी चालत्या ट्रेनमध्ये चढण्याचा प्रयत्न केला आणि त्यांना ट्रेनने धडक दिली. रेल्वे अधिकारी आणि स्थानिक पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली आणि बचावकार्य सुरू केले. गंभीर जखमी झालेल्या प्रवाशाला रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. मृतांची ओळख पटवली जात आहे. हे सर्व बिहारला जाणारे प्रवासी असल्याचे मानले जात आहे.



## वालीव गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या कारवाईत दोन चरस/गांजा विक्री आरोपींना अटक

**■वसई। प्रतिनिधी,**

चरस/गांजा विक्री करणाऱ्या २ आरोपीस अटक वालीव गुन्हे प्रकटीकरण शाखेची कामगिरी. अधिक माहितीनुसार वालीव पोलीस ठाणे हद्दीत दिनांक ०८/१०/२०२५ रोजी इरफान खत्री नावाचा इसम हा वसई पूर्व खैरपाडा येथे त्याचे राहते घरातुन चरस नावाचा अंमली पदार्थ विक्री करीत असल्याची गोपनीय खात्रीशीर माहिती मिळाली होती. सदर कारवाई करण्याबाबत मा. पोलीस उप आयुक्त वसई २ यांनी आदेश दिल्याने सहा.पो.आयुक्त तुळींज व वपोनि/वालीव पोस्टे यांच्या मार्गदर्शनाखाली गोरक्षनाथ जैद पो. निरीक्षक (गुन्हे) तसेच गुन्हे प्रकटीकरण अधिकारी व अंमलदार यांचेसह कारवाई करण्यासाठी टिम तयार करुन वसई पूर्व वालीव गाव, खैरपाडा, चिंतामणी कम्पाऊंडमधील मोमीन चाळीतील रुम नं १२ समोर रुममध्ये असलेल्या एका ७० वर्ष वयोगटातील इसमास ताब्यात घेवून सदर आरोपी इरफान सुलेमान खत्री, वय ७० वर्षे, रा. आदर्श मोमीन चाळ, रुम नं १२, चिंतामणी कंपाऊड, खैरपाडा, वसई पूर्व याची अंगझडती घेतली असता त्याच्या अंगझडतीमध्ये १०८८ ग्रॅम वजनाचा चरस हा अंमली पदार्थ, मोबाईल, रोख रक्कम असा एकुण १६,३७,०८०/- रुपये किंमतीचा मुददेमाल जप्त करण्यात आला. त्याचेकडे सदर गुन्हयाबाबत अधिक तपास केला असता आरोपी तबरेज अमीन मियान खान वय २५ वर्ष, रा. डायमंड बिल्डींग, लक्ष्मी नारायण रेशीडेन्शी, चुर्तवेदी इस्टेट, काल्हेरगाव, ता. भिवंडी जि.ठाणे हा आरोपी निष्पण झाल्याने त्यास वालीव वसई पूर्व परीसरातुन ताब्यात घेवुन त्याचेकडुन १३८६ ग्रॅम वजनाचा चरस अंमली पदार्थ व १०५० ग्रॅम वजनाचा गांजा अंमली पदार्थ, रोख रक्कम, मोबाईल असा मुदेमाल जप्त करण्यात आला. व दोन्ही आरोपीं कडुन ३७,५१,०८०/- एकुण रुपये किमतीचा २ किलो ७४ ग्रॅम चरस व १ किलो ५० ग्रॅम गांजा व इतर मुददेमाल जप्त करण्यात आला. सदर बाबत वालीव पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


वरील कामगीरी मा. श्रीमती. पौणीर्मा चौघुले श्रींगी, पोलीस उप आयुक्त, परीमंडळ २ वसई, मा. श्री. उमेश माने पाटील, सहाय्यक पोलीस आयुक्त, तुळींज विभाग, वालीव पोलीस ठाणे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. दिलीप घुगे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. गोरक्षनाथ जैद यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटिकरण शाखेचे स.पो.नि. विश्वासराव बाबर, सहा. फौजदार शैलेश पाटील, पो.हवा/किरण म्हात्रे, पो.हवा/आनंद मोरे, पो.हवा/बाळु कुटे, पो.हवा/विनायक राऊत, पो.अं/अनिकेत पाटील, पो.अं/सचिन लांडगे, पो.अं/केतन गोडसे, मसुब / नागनाथ केंद्रे यांनी यशस्वीरित्या कामगिरी पार पाडली आहे.



संपादकीय...

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# मतचोरीचा मुद्दा कळीचा ठरणार?



**महाराष्ट्रात मतचोरीच्या आरोपांमुळे राजकीय वातावरण तापले आहे. मविआने निवडणूक आयोगावर तीव्र टीका करत लोकशाहीवरच प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे, तर महायुतीने हे आरोप फेटाळले आहेत. आगामी निवडणुकीत 'मतचोरी' हा कळीचा मुद्दा ठरणार आहे.**

विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्रात मतचोरी झाल्याचा दावा काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केला आणि महाराष्ट्रातील राजकारण सध्या याच मुद्द्यावरून पेटले आहे. निवडणूक आयोगासह महायुतीला महाविकास आघाडीच्या नेत्यांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले आहे. त्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचे पडघम वाजू लागले असून रस्ते, पाणी, आरोग्य, कचरा या मूलभूत प्रश्नांकडे डोळेझाक करत मतचोरीचा मुद्दा मविआ लावून धरणार यात दुमत नाही. मतचोरी झाली मविआचा दावा, तर मतचोरीच्या नावाखाली राजकारण महायुतीचा दावा एकूणच आगामी निवडणुकीत विशेषतः मुंबई महापालिका निवडणुकीत मतचोरीचा मुद्दा कळीचा ठरणार आहे. देशातील विविध राज्यात लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत बोगस मतदान झाल्याचा विरोधकांचा दावा आहे. महाराष्ट्रात महायुती वगळता सर्वच राजकीय पक्षांकडून मतचोरीचे प्रकरण लावून धरले आहे. महाविकास आघाडीच्या पत्रकार परिषदेत पालघर, नाशिक, बीड आदी भागात शून्य क्रमांकाच्या घरात वास्तव करणारे शेकडो लोक असल्याचे निदर्शनास येत आहे. अनेकांचे वय भूतकाळाला लाजवेल असे आहे. पूर्वी शेकडो वर्षे जगणारी माणसं होती. आयोगाने तर मुलाने बापाला जन्म दिल्याचा अनोखा अविष्कार घडवला आहे. मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी तर कोणी कोणाला काढलंय असे मिश्किल विधान करून आयोगाच्या इज्जतीचा पार कचरा केला आहे. आयोगाची मतदार यादी मतचोरीच्या आरोपाला वाव देत असली, तरी आयोगाचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम आणि राज्य निवडणूक आयोगाचे दिनेश वाघमारे चाचपडत आहेत, तर दुसरीकडे केंद्रीय निवडणूक आयोगाकडे बोट दाखवले जात आहे. परंतु शिंदे गटाचे आमदार विलास भुमरे यांनी विधानसभा निवडणुकीत २० हजार मते बाहेरून आणल्याचा दावा भर सभेत केला. परंतु आरोपानंतर आणि शिवसेना मुख्य नेते एकनाथ शिंदे यांनी समज दिल्यानंतर विलास भुमरे यांनी सारवासारव करण्याचा प्रयत्न केला; मात्र मविआच्या नेत्यांना आयते कोलीत मिळाल्याने निवडणूक आयोगासह महायुतीवर टीकेची झोड उठवली आहे. निवडणूक आयोगाने मात्र यावर अद्याप तरी खुलासा केलेला नाही. उलट भाजप आणि शिंदे गटाकडून विरोधकांवर टीका सुरू आहे. राज ठाकरेंना सोबत घेऊन उद्धव ठाकरे यांनी महाविकास आघाडीचे सारथ्य पेलत मतचोरी रोखण्याचा धनुष्यबाण उचलला आहे. विरोधकांच्या या एकजुटीला खरंच यश येईल अन् सत्ताधाऱ्यांच्या चोरवाटा रोखल्या जातील का? हे येणाऱ्या काळात स्पष्ट होईलच. महाराष्ट्रात मतचोरीच्या आरोपांनी राजकीय तापमान तापले आहे. मतदार याद्यांतील गोंधळ, नावे वगळणे, नव्या उमेदवारांची नोंदणी, वगळलेल्या नावांची यादी सार्वजनिक करावी, दुबार नोंदणी कशी रोखता येईल, व्हीव्हीपॅट यंत्रणा कुठे आहे याची माहिती देणे, जुलै २०२५ नंतरच्या १८ वर्षांवरील तरुणांना मतदानाचा हक्क मिळावा याबाबत मविआने निवडणूक आयोगाला लेखी निवेदन दिले. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी 'वोट चोरी' या मुद्द्यावर खुली आणि कटाक्षाने भूमिका घेतली आहे, तर दुसरीकडे विरोधी पक्ष आणि सरकार या आरोपांवर गोंधळात पडले आहेत. केंद्र आणि राज्य सरकारांच्या अधिकाऱ्यांनी आरोपांचे खंडन करत राजकीय आरोप असल्याचे सांगत मविआचे मतचोरीचे आरोप एकप्रकारे धुडकावून लावले आहेत, तर आगामी निवडणुकीत विरोधकांकडे मूलभूत प्रश्नांचा मुद्दा नसल्याने मतचोरीची ओरड करणार यात शंका नाही; मात्र आगामी निवडणुकीत मतचोरी हाच मुद्दा महायुती आणि महाविकास आघाडीसाठी कळीचा ठरणार आहे. सन २०२४ मध्ये पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीत मविआला महाराष्ट्रात जनतेने कौल दिला; मात्र विधानसभा निवडणुकीत जनतेने मविआला नाकारले; मात्र निवडून येण्याची शाश्वती तरीही पराभव यावरून मविआ नेत्यांच्या मनात पाल चुकचुकली, तर लोकसभेचे विरोधी पक्षनेते काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी मतचोरीचा मुद्दा उकरून काढला आणि केंद्रीय निवडणूक आयोगासह भाजप सरकारला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले आहे. मतचोरी झाली याचे अनेक पुरावे राहुल गांधी यांनी सादर केले; मात्र राहुल गांधी यांचे आरोप बिनबुडाचे असे सांगत महायुतीच्या नेत्यांनी राहुल गांधी यांचे डोके चोरीला गेले, अशी टीका केली. मात्र राहुल गांधींसह मविआ नेते मतचोरी झाल्याच्या मुद्द्यावरून आक्रमक भूमिका घेतली असून, आगामी निवडणुकीत मतचोरी हाच मुद्दा मविआ नेते लावून धरणार आणि महायुतीची मतांची कोंडी करणार. एकूणच मविआचा मतचोरीचा आरोप यात किती तथ्य हा संशोधनाचा भाग आहे; मात्र पुढील दोन ते तीन महिने मतचोरी हाच विषय राजकारणात चर्चेत राहणार, हेही तितकेच खरे. 'वोट चोरी' या आरोपांनी राज्याचे राजकारण पेटून उठले आहे. मतदार याद्यांतील गोंधळ, ईव्हीएमवरील संशय आणि मतदारांना न कळता त्यांची नावे वगळली जाणे या सर्व प्रकारामुळे लोकशाहीच्या प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह उभे केले आहे. महाविकास आघाडीसह मनसेने या मुद्द्यावर राजकीय रणसंग्राम उभारला आहे. मतचोरी म्हणजे लोकशाहीची हत्या आहे; मतदाराचा आवाज चोरला तर सरकार कोणत्याही नैतिकतेवर उभे राहू शकत नाही, असा हल्लाबोल मविआ नेत्यांनी निवडणूक आयोगावर चढवला आहे. निवडणूक आयोग आणि सत्ताधारी पक्ष यांच्यात संगनमत असल्याचा संशय मविआ नेत्यांनी व्यक्त केला आहे. काही जिल्ह्यांत मतदार याद्यांत एकाच नावाची दोन नोंदी, तर काही ठिकाणी हजारो नावे गायब, असा आरोप मविआने केला आहे. भाजप आणि शिंदेंच्या सेनेने मविआच्या या आरोपांना 'राजकीय रडगाणे' म्हटले आहे. विधानसभा निवडणुकीत झालेल्या पराभवाचे खापर मतदान यंत्रांवर फोडत आहेत; मात्र निवडणूक आयोग स्वतंत्र आहे, त्याचा अपमान करणे म्हणजे देशाच्या लोकशाहीचा अपमान आहे. लोकशाहीचा पाया म्हणजे 'विश्वास' आणि तोच ढासळू लागला आहे. जर मतदाराला त्याचे मत सुरक्षित नाही असे वाटणे स्वाभाविक आहे. महाराष्ट्रातील निवडणुका केवळ पक्षीय नव्हे, तर 'विश्वास विरुद्ध अविश्वास' यांच्यातील लढत असते. एकीकडे सत्ता टिकवण्याचा आटापिटा करणारे सत्ताधारी पक्ष, तर दुसरीकडे मतांचे रक्षण करण्याचा निर्धार घेतलेले विरोधक. एकूणच आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत मतचोरी याच मुद्द्याला प्राधान्य असणार आहे.

# नक्षलवादाच्या मुळावर घाव घातल्याचा चांगला परिणाम

सशस्त्र नक्षलवाद्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी केंद्र सरकारने राबवलेल्या मोहिमेला दिवसेंदिवस मोठे यश मिळत आहे. देशातील नक्षलवाद्यांना शस्त्र खाली ठेवायला सांगून यांचे पुनर्वसन करण्याची योजना केंद्र सरकारने यापूर्वीच जाहीर केली होती. याला प्रतिसाद न देणाऱ्यांशी दोन हात करून त्यांचा खात्मा करण्यातही सरकार पुढे होते. अखेर या प्रयत्नांना यश आल्याचे बुधवारी अधोरेखित झाले. पाच राज्यांमधील नक्षलवादी हल्ल्यांचा सूत्रधार आणि मोस्ट वॉन्टेड नक्षलवादी टॉप कमांडर मल्लोजुला वेणुगोपाल राव ऊर्फ भूपती याने त्याच्या ६० हून अधिक नक्षली साथीदारांसह मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत बुधवारी आत्मसमर्पण केले. भूपती हा माओवादी संघटनेच्या केंद्रीय समितीचा सदस्य आणि पॉलिट ब्युरोचा तगडा सदस्य होता. भूपती हा सोनू, सोनू दादा, वेणुगोपाल, अभय, मास्टर, विवेक आणि वेणू यासारख्या अनेक नावांनी ओळखला जातो. भूपतीच्या आत्मसमर्पणामुळे नक्षलवादी चळवळीचा अंत जवळ आल्याचे म्हटले जात आहे, याचे श्रेय निश्चितच केंद्र सरकारला आणि गृहमंत्री अमित शहा यांच्या नेतृत्वाला द्यावे लागेल.

वास्तविक सुरक्षा दलांनी कोंडी केल्यामुळे नक्षलवादी आणि त्यांचे नेते अडचणीत सापडले आहेत. विशेष म्हणजे यंदा चार महिन्यांत दोनदा नक्षलवाद्यांनी सरकारसमोर शस्त्रसंधी तसेच शांतीचा प्रस्ताव ठेवला होता. यात भूपती आघाडीवर होता. तेव्हाच नक्षलवाद्यांमध्ये उभी फूट पडल्याचे निश्चित झाले होते. यंदा मे महिन्यात नक्षलवाद्यांनी पहिल्यांदा नक्षलवाद्यांविरोधात कारवाई थांबवण्याची सरकारकडे विनंती केली होती. मात्र, सरकारने त्यांच्या आवाहनाला अजिबात जुमानले नाही. उलट छत्तीसगड तसेच दंडकारण्यातील सुरक्षा यंत्रणांच्या कारवाया अधिक जोमाने सुरू ठेवल्या. त्यानंतर २१ मे रोजी नक्षल्यांचा सर्वोच्च नेता खंबाला केशवराव ऊर्फ बसवराजू याला चकमकीत ठार करण्यात आले. यामुळे नक्षलवाद्यांना मोठा धक्का बसला होता. त्यानंतर भूपतीने पुन्हा पत्रक काढून सरकारकडे शस्त्रसंधीची विनंती केली होती. १७ सप्टेंबर रोजी त्याने अल्पकाळासाठी शस्त्रसंधीची तयारी दाखवली होती. भूपतीची ही भूमिका केंद्रीय समितीतील सदस्यांना अजिबात पटली नाही. भूपती हा नक्षलवादी संघटनेचा प्रभावशाली रणनीतिकार मानला जातो. तो अनेक वर्षे महाराष्ट्र-छत्तीसगड सीमेवरील प्लाटूनचा मार्गदर्शक होता. असे असूनही त्याने सशस्त्र संघर्ष निष्फळ ठरल्याचे मान्य करून शस्त्रसंधी स्वीकारण्याचे आवाहन केले होते.

संघर्ष नव्हे तर संवादच पर्याय आहे, अशी भूमिका तो वारंवार घेत होता. मात्र, भूपती या निर्णयाप्रती एका रात्रीत आला नव्हता. कारण दोन दशकांत गडचिरोली जिल्ह्यात ७०० हून अधिक नक्षलवाद्यांनी आत्मसर्मपण करून शांततेत जगण्याचा मार्ग स्वीकारला होता. सरकारनेही त्यांच्या पुनर्वसनाची जबाबदारी स्वीकारली होती. आणखी एक महत्त्वाची घटना या वर्षाच्या सुरुवातीलाच घडली. भूपतीची पत्नी नक्षलवाद्यांच्या दंडकारण्य विभागाची सदस्य विमला ऊर्फ तारक्का हिने मुख्यमंत्री



फडणवीस यांच्या उपस्थितीत आत्मसर्मपण केले होते. तर केंद्रीय समिती सदस्य आणि सर्वोच्च महिला नक्षल नेत्या पोथुला पद्मावती ऊर्फ सुजाता हिने सप्टेंबरमध्ये शरणागती स्वीकारली होती. सुजाता ही भूपतीची वहिनी आहे. तर भूपतीचा मोठा भाऊ किशनजी २०११ मध्ये पश्चिम बंगालमधील चकमकीत ठार झाला होता. त्यामुळे संघर्षापेक्षा संवादच महत्त्वाचा याची प्रचिती भूपतीला येत होती. शिवाय त्याच्या घरातील सदस्यच आत्मसमर्पण करत होते. त्यामुळे लढून उपयोग होत नाही, याची जाणीव त्याला झाली होती. म्हणून भूपती वारंवार शस्त्रसंधीचा प्रस्ताव सरकारपुढे ठेवत होता.

भूपती वाणिज्य शाखेतील पदवीधर आहे. २०१० मध्ये माओवादी प्रवक्ते चेरुकेरी राजकुमार (आझाद) यांच्या हत्येनंतर भूपती माओवाद्यांचा आवाज बनला होता. त्याने जवळजवळ चार दशके रेड कॉरिडॉरमध्ये दहशत पसरवली होती. विशेष म्हणजे अनेक मोठ्या हल्ल्यांचे नियोजन आणि अंमलबजावणी करण्यात भूपतीचा सहभाग होता. त्यामुळे महाराष्ट्रासह ओडिशा, तेलंगणा, छत्तीसगड आणि आंध्र प्रदेशासह अनेक राज्यांतील पोलीस त्याच्या मागावर होते. भूपतीला पकडून देण्यासाठी सरकारने १ कोटी रुपयांचे बक्षीस जाहीर केले होते. यावरून भूपतीची दहशत आणि त्याचे नक्षलींमधील स्थान लक्षात येते. नक्षलवाद्यांचा बिमोड करण्यासाठी मोदी सरकारने दशकापूर्वी योजना आखली होती. त्यांच्या विरोधात सशस्त्र कारवाई अधिक कडक केली होती.

नक्षलवाद्यांनी एकतर शस्त्र ठेवून आत्मसमर्पण करून मुख्य प्रवाहात सहभागी व्हावे अन्यथा त्यांचा सशस्त्र कारवाईत खात्मा करायचा, हे दोनच पर्याय केंद्र सरकारने त्यांच्यासमोर ठेवले होते. त्यानंतरही नक्षलींकडून वारंवार कमांडोंवर हल्ले सुरूच होते. मात्र, न डगमडता सरकार त्यांचे हल्ले परतवून कारवाई करत होते. या मोहिमेचा परिणाम असा झाला की हळूहळू नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पणाचा मार्ग स्वीकारायला सुरुवात केली. आताही भूपतीनंतर आणखी काही नक्षलवादी आत्मसमर्पण करणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले. नक्षलवाद्यांची सशस्त्र मोहीम हाणून पाडण्यात सशस्त्र दलाला यश येत आहे, हे यश केंद्र सरकारने राबवलेल्या मोहिमेचे आहे. याबद्दल केंद्र आणि राज्य सरकारचेही अभिनंदन करायला हवे!

# संयम नि शांतता

आयुष्य म्हणजे सहजतेच्या क्षणांची आणि कठीण परिस्थितींची अखंड शृंखला आहे. कोणताही काळ - सुखाचा असो वा दुःखाचा - कायम टिकणारा नाही. ज्याप्रमाणे ऋतूंचे चक्र फिरते, तशाच सुखदुःखांच्या लाटा येत-जात असतात. कठीण काळात संयम आणि शांतपणे निर्णय घेण्याची कला, हेच जीवनाचे मूलभूत गमक आहे. संकटे आली की मन विचलित होणे, भीतीने ग्रासणे हे स्वाभाविक आहे. पण याच क्षणी संयमाचे महत्त्व उदयाला येते. भावनांच्या भरात तावातावाने घेतलेले निर्णय अनेकदा घातक ठरतात. तुफानातील समुद्रावर धैर्याने वळण घेणारा नाविक, तसाच कठीण काळात शांत डोक्याने विचार करून पावले टाकणारा माणूस यांना अंततः किनारा लाभतो. एखादा विद्यार्थी परीक्षेत अपयशी ठरतो, पण नैराश्याने किंवा रागाने त्याने शिक्षण सोडल्यास त्याचे भविष्य अंधकारमय होईल. पण, जो संयम ठेवून अपयशाची कारणे शोधतो, अधिक मेहनत करतो, त्याचे पुढील प्रयत्न यशस्वी होतात. संत महात्मे आणि प्रेषितांनीही याच मार्गाचे दिग्दर्शन केले आहे. भगवद्गीतेतील योगः कर्मसु कौशलम् (कर्म करण्यात कुशलता म्हणजेच योग) हे सूत्र हाच संदेश देते - फळाची चिंता न करता, आपले कर्तव्य शांतचित्ताने बजावणे. 'काल करे सो आज कर, आज करे सो अब, पल में परलै होएगी, बहुरि करोगे कब'. अर्थात - उद्या करावयाचे ते आजच कर, आज करावयाचे तत्क्षणी कर. क्षणात प्रारब्ध संपेल, पुन्हा कधी करणार? आपल्या हाती केवळ कर्म करणे आहे, फळ नाही. हा कर्मयोगाचा सिद्धान्तच जीवनाचा खरा आधारस्तंभ आहे. संस्कृत सुभाषित स्पष्ट करते : 'उद्यमेन हि सिध्यन्ति कार्याणि न मनोरथैः, न हि सुप्तस्य सिंहस्य प्रविशन्ति मुखे मृगाः'. म्हणजेच, उद्योगानेच कार्ये साध्य होतात, मनोरथांनी नाही. सिंहाच्या तोंडात हरिण स्वतःच येत नाहीत. थोडक्यात, आयुष्याची सहजता आणि कठीणता ही दोन्ही निसर्गाच्या गतीप्रमाणेच अनिवार्य आहेत. सुखात अहंकार न बाळगणे आणि दुःखात धैर्य सोडून न देणे हेच शहाणपण आहे. कठीण काळात संयम, शांतता आणि विवेकपूर्ण कर्म यातूनच आपण आव्हानांना तोंड देऊ शकतो आणि जीवनाचे खरे गमक जाणून घेऊ शकतो. थोरांनी दाखवलेल्या या मार्गाने चालणे हीच मानवी जीवनाची परमसार्थकता आहे.

# दुसऱ्याला तुच्छ लेखण्याची वृत्ती मुलांमध्ये का वाढतेय!







**सोशल मीडियावर भपकेबाजपणाचे, मोठेपणाचे दिखाऊ फोटो टाकून पालकच नाही तर मुलंही सोशल स्टेटसचा बडेजाव करताना दिसतात. यातून मुलांमध्ये समोरच्याला तुच्छ समजण्याची वृत्ती वाढतेय. यात मग दिमतीला सोशल मीडिया आहेच. त्यामुळे मला सगळंच येतं. तुम्ही आम्हाला शिकवू नका, हा तोरा मुलांमध्ये वृद्धिंगत होताना दिसतोय. त्याचेच परिणाम झेन जींना बघितल्यावर कळतात. स्वत:मध्ये रममाण होणाऱ्या या जेन झींकडूनच इशितची अल्फा पिढी शिकतेय. जेन झींना मिळणारी सोशल मीडियावरील प्रसिद्धी बघून अल्फा पिढी अजून एक पाऊल पुढे जाऊ लागली आहे. त्याचेच पडसाद इशित भट्ट याच्या बिग बी अमिताभ बच्चन यांच्याशी बोलताना दिसत होते.**

सध्या सोशल मीडियावरच नव्हे तर घराघरात, ट्रेन, बस, ऑफिस, शाळांमध्ये, नाक्यावर गुजरातचा इशित भट्ट नावाचा चिमुरडा आणि त्याचे आईवडील चर्चेत आहेत. याला कारण ठरलं आहे ते 'कौन बनेगा करोडपती' या शोमध्ये बिग बी अमिताभ बच्चन यांच्याशी इशितचे उद्धटपणे वागणं. बिग बींसारख्या ज्येष्ठ व्यक्तीबरोबर १० वर्षाच्या मुलाचं असं वागणं कोणालाही रुचलेलं नाही. तर काहींना मात्र या मुलाची कीव येत आहे. पण तरीही आजच्या तारखेला गुगलवर मोस्ट हेडेट किड म्हणून इशितचं नावच झळकतंय. ज्या वयात इशितचं कौतुक होणं त्याच्या पालकांना अपेक्षित होतं त्याच वयात त्याच्याबद्दल लोकांमध्ये निर्माण झालेला द्वेष, राग बघून त्याचे पालकही नक्कीच धास्तावले असतील. कारण त्याच्या या उद्धट, उर्मट वर्तुणकीचा ठपका त्याच्या आईवडिलांवरही ठेवला जात आहे.

मुलांच्या जडणघडणीत पालकांचा मोठा वाटा असतो हे सर्वश्रुत आहेच, पण तरीही एकंदर आजची परिस्थिती पाहता मुलांवर जसा कुटुंबाचा परिणाम असतो तसाच तो ज्या सामाजिक, आर्थिक वातावरणात वाढतो त्याचाही होतोच.. आजची सामाजिक परिस्थिती पाहता सगळीकडेच भपकेबाजपणाची चलती आहे..त्यातच डिजिटल युग आहे.. यामुळे मुलांवर या सगळ्या गोष्टींचा परिणाम होणं स्वाभाविक आहे..आज मुलांना स्वतःचे महत्त्व दाखवण्यासाठी सगळेच प्लॅटफॉर्म उपलब्ध आहेत..या प्लॅटफॉर्मवर आपण प्रसिद्ध झाल्यास त्याचे काय परिणाम होतात हे मुलांना माहीत आहे..एका रात्रीत सेलिब्रिटी करण्याची ताकद या प्लॅटफॉर्मवर असल्याने तो मिळणे आणि त्यावर जगासमोर स्वतःला सिद्ध करण्याची संधी मिळणे हे इशितसारख्या मुलासाठी स्वप्नवत होतं.

इशितचे बिग बींबरोबरचे वागणे, त्यांच्या सूचना पूर्ण होण्याआधीच त्यांना गप्प करण्यासाठी इशितने उच्चारलेली वाक्ये त्यातून त्याचा झळकणारा फाजील उत्साह, आत्मविश्वास बघून बिग बींसह सगळेच चाट पडले. पण बिग बींनी अतिशय परिपक्वतेने वयाला साजेशे वर्तन करत इशितला हाताळले. हे खरे. पण त्यानंतर सगळेच इशित आणि त्याच्या कुटुबांवर तुटून पडलेत. त्याच्या उर्मटपणाला पालक कसे जबाबदार आहेत हे सांगण्यासाठी सगळेजण हातातलं काम टाकून सोशल मीडियावर व्यक्त होत आहेत. यावर बोलताना एका शिक्षिका असलेल्या मैत्रिणीने सांगितलेला किस्सा फारच धक्कादायक आहे. दादरमधील एका नामांकित शाळेत ती पाचवीतल्या मुलांना शिकवते. इशितच्या वयाच्याच मुलांना ती शिकवत असल्याने तिने सांगितलेला अनुभव सगळ्याच पालकांना विचार करायला लावणारा आहे. तिच्या वर्गात ५० मुलं आहेत.

यातील ५ ते ७ मुलं त्यातल्या त्यात शिक्षकांना मान देणारी, त्यांचं ऐकणारी आहेत. तर बाकीची मुलं इशितप्रमाणेच सधन घरातील, ओव्हर कॉन्फिडन्स आणि आगाऊ, आम्हाला सगळंच कळतं या थाटात जगणारी आणि आपल्या आईबापाच्या श्रीमंतीची टिमकी वाजवणारी असल्याचं तिने सांगितलं. त्यामुळे बऱ्याच वेळा अशा मुलांबरोबर डिल करणं कठीण जातं. एकदा तर वर्गात शिकवताना दोन मुलं गप्पा मारत होते. त्यांना तिने हटकले आणि वर्गातून बाहेर काढेन, असा इशारा तिने दिला. त्यावर ती दोनच मुलं नाही तर त्यांच्या मदतीला इतर मुलंही तिच्या अंगावर धावून आली. तुमचं काम आहे शिकवण्याचं ते तुम्ही करा. त्यासाठी आमचा बाप फी देतो शाळेला. म्हणून तुमचे पगार निघतात. तुमचं आम्ही ऐकायलाच हवं अशी जबरदस्ती तुम्ही करू शकत नाही. नाहीतर पप्पांना फोन करून तुम्हालाच नोकरीवरून काढायला सांगू, अशी धमकीच एका मुलाने तिला दिली. पाचवीची ही मुलं वयाने जरी लहान असली तरी त्यांना घरातल्यांकडून, बाहेरच्या समाजाकडून मिळणारा एक्सपोझर किती धोकादायक आहे, त्यातून या मुलांमध्ये येणारा हा अहंकार किती विध्वसंक आहे हे दिसते. आईवडिलांकडून फाजील लाड श्रीमंत घरातील मुलांना बिघडवण्यास कारणीभूत ठरत आहेत. शाळेला आपण फी देतो त्यातूनच शिक्षकांना पगार मिळतो हे घरात कानावर पडत असल्याने समोरचा शिक्षक आपला नोकरच असल्याच्या अविर्भावात ही मुलं वावरतात.

त्यातच सोशल मीडियाचाही परिणाम या मुलांच्या कोवळ्या मनावर होऊ लागला आहे. केवळ एका ३ मिनिटांच्या रिलमुळे आपण प्रसिद्ध होतो. हे मुलांना कळतं. टीव्हीवर दिसल्याने आपला स्टेटस कसा वाढतो हे या मुलांना चांगलंच कळालंय. यातूनच मग आपण सेलिब्रिटी होतो हेदेखील या मुलांना समजतं. त्यात पालकांचा अतिउत्साहही नडतो. आपलं मूल सोशल मीडियावर हीट होतंय. त्याला लोक ओळखू लागलेत यात पालक खुश. शिवाय इतर मुलं जेव्हा शाळेचा अभ्यास करतात त्यावेळी ही सेलिब्रिटी मुलं पैसा कमवू लागलेत. हेदेखील त्यांना इतर मुलांपेक्षा वेगळं ठरवत आहे. शिवाय सोशल मीडियामुळे घराघरात पोहचलेली ही मुलं इन्फ्ल्युएन्सर झालेत. आईबाप मुलांना काम करायला लावून पैसे मोजू लागलेत. त्यामुळे ही मुलं स्वतःला वेगळी समजू लागली आहेत. त्यातच पोरांचं कौतुक करताना आपला तो बाळ्या आणि दुसऱ्याचं ते कार्ट असा काहीसा पालकांचा ॲटिट्यूड असतो. मुलांवरही त्याचा परिणाम होतोय. याचं उत्तम उदाहरण आहे बालकलाकार मायरा वायकूळ. ही मुलगी सुरुवातीला फारच गोड वाटायची. तिचं निरागस दिसणं आणि वागणं यामुळे तिचा वेगळा फॅन फॉलोईंग होता. पण कामाच्या निमित्ताने तिच्या इतर सेलिब्रिटीबरोबरच्या उठा बस वाढल्या. नकळत तिच्या बालमनावरही त्याचा परिणाम झाला. मीडियाशी बोलताना मायरादेखील सेलिब्रिटीजप्रमाणे समंजस बनून बोलू लागली. जे तिच्या त्या वयाला साजेशे नव्हते. त्यावरूनही मायराला प्रचंड ट्रोल करण्यात आलं. तिने त्या काळात पैसा आणि प्रसिद्धी कमावली, पण ती लहान आहे हेच ती विसरली. इशितच्या बाबतीतही तेच झालं.

केबीसी सगळं जग बघतं हे त्याला माहीत आहे. त्यातच घरात तो आईबाबा, आजी-आजोबा एवढा गोतावळा असल्याने तो सधन घरातील लाडाकोडात वाढलेला. पण या अतिलाडामुळे लहान मोठी नाती, त्यातून येणारा विनम्रपणा तो विसरला. घरातील सततच्या कौतुकामुळे त्याला कोडकौतुक करून घेण्याची सवय जडली. एकंदर मुलांच्या जडणघडणीत पालकांचा मोठा वाटा असल्याने मुलांवर संस्कार करताना पालकांनाही काळानुरूप बदल स्वीकारावे लागत आहेत. जगात असे कोणीही पालक नाहीत जे मुलांवर वाईट संस्कार करत असतात. यामुळे सरसकट इशितच्या पालकांना दोषी ठरवणंही योग्य नाही. कारण आताच्या या डिजिटलच्या जमान्यात मुलं आईवडिलांपेक्षा सोशल मीडियावरच जास्त वेळ घालवत आहेत. त्यामुळे नात्यागोत्यापेक्षा ही मुलं मोबाईल, लॅपटॉपवरच जास्त रमतात. त्यातच त्यांचं जग सामावत आहेत. अशावेळी ते चॅटजीपीटीसारख्या माध्यमातून मन मोकळी करू लागली आहेत. त्यांना हवे तेव्हा आईवडील जितके उपलब्ध नसतील तेवढा सोशल मीडिया त्यांच्या २४ तास दिमतीला उभा आहे. त्यांच्या हव्या त्या शंकांचे निरसन ते करत आहेत. शिवाय त्यासाठी सोशल मीडियाला मानपान देण्याची गरज नाही. आपसूकच ती पद्धत मुलांच्या स्वभावात उतरू लागली आहे. हल्ली तर आपण फारच पुढारलेले आहोत हे दाखवण्यासाठी पालकच मुलांना इतकं स्वातंत्र्य देत आहेत की पोरं आईबापाला नावाने हाक मारताना दिसतात. त्यातच पालकांना असलेलं भपकेबाजपणाचं व्यसन मुलांमध्येही उतरू लागले आहे. आपण इतरांपेक्षा किती वेगळे आहोत, सधन आहोत, सुशिक्षित आहोत हे दाखवण्याचा पालकांना असलेला हव्यास मुलांमध्येही येतोय.

सोशल मीडियावर या भपकेबाजपणाचे, मोठेपणाचे दिखाऊ फोटो टाकून पालकच नाही तर मुलंही सोशल स्टेटसचा बडेजाव करताना दिसतात. यातून मुलांमध्ये समोरच्याला तुच्छ समजण्याची वृत्ती वाढतेय. यात मग दिमतीला सोशल मीडिया आहेच. त्यामुळे मला सगळंच येतं. तुम्ही आम्हाला शिकवू नका, हा तोरा मुलांमध्ये वृद्धिंगत होताना दिसतोय. त्याचेच परिणाम जेन झींना बघितल्यावर कळतात. स्वतःमध्ये रममाण होणाऱ्या या जेन झींकडूनच इशितची अल्फा पिढी शिकतेय. जेन झींना मिळणारी सोशल मीडियावरील प्रसिद्धी बघून अल्फा पिढी अजून एक पाऊल पुढे जाऊ लागली आहे. इशित हे त्याचे ताजे उदाहरण आहे. संस्काराची देवाण घेवाण ही अशीच तर होत असते. एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे. मग जेन झींकडून आपण काय अपेक्षा ठेवावी हा प्रश्नच आहे.

